# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

www.dainikhindusthan.com

epaper.dainikhindusthan.com







■ वर्ष ७६ वे/अंक ३४१ वा ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ अमरावती, बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ ■ ■ भारतीय सौर ७ श्रावण १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■







## आज गुरुपौर्णिमा



विनयफलं शुश्रूषा गुरुशुश्रूषाफलं श्रुतं ज्ञानम्।
ज्ञानस्य फलं विरतिः विरतिफलं चाश्रवनिरोधः।।

# आता सीजेपीचे पुन्हा सर्वात मोठे आंदोलन; देशात आता नवे वादळ

नवी दिल्ली दि. २८ : कॉकरोच जनता पार्टीचे दिल्लीतील आंदोलन सध्या संपलेले आहे. परंतु या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या देशभरातील तरुणांवर कारवाई केली जात आहे. याच कारवाईला सीजेपीने कठोर विरोध चालू केला आहे. सरकारने सर्व गुन्हे मागे घेतले जातील, असे आश्वासन दिले होते. परंतु हे आश्वासन पाळले जात नाहीये, असा आरोप सीजेपीने केला आहे. असे असतानाच आता सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सरकारला गंभीर इशारा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानंतर दीपके यांनी आम्ही पुन्हा आंदोलन करू, असं म्हटलंय.



सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांच्या मतानुसार सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखाली एक अंतरिम आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशानुसार सध्या जे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्यानुसार तपास चालूच ठेवावा, असे या आदेशात म्हणण्यात आले आहे. याच अंतरिम आदेशानंतर सीजेपीने असमाधन व्यक्त करत पुन्हा एकदा आंदोलन करू, असा इशारा दिला आहे.

अभिजीत दीपके यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, पोलिसांकडून विद्यार्थ्यांचा छळ सुरूच राहिला, तर कॉकरोच जनता पार्टी लवकरच देशभरात मोठ्या प्रमाणावर शांततापूर्ण आंदोलन *(पान २ वर)*

## कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई आवश्यक : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि. २८ : दिल्लीतील सीजेपीच्या आंदोलनामध्ये गोंधळ घालणाऱ्यांवर कारवाई प्रकरणी मोठी चर्चा सुरू आहे. यावर आज सुप्रीम कोर्टाने टिप्पणी केली. देशभरात विद्यार्थी आंदोलनांदरम्यान घडलेल्या घटनांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.



भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, आंदोलने हा लोकशाहीचा एक भाग आहे आणि देशभरातील सार्वजनिक निदर्शने व आंदोलनांना पोलिसांच्या प्रतिसादाचे नियमन करण्यासाठी एका स्पष्ट नियमावलीची आवश्यकता आहे.

विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस अत्याचारांच्या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी का करू *(उर्वरित पान २ वर)*

## सीजेपीच्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या : मुख्यमंत्री

मुंबई दि. २८ : महाराष्ट्रात नीट पेपर फुटी प्रकरण समोर आल्या नंतर एकच खळबळ उडाली. याचे पडसाद देशभरात पडल्यानंतर तरुणाईने त्याविरोधात आवाज उठवला. कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली ३६ दिवस आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात ऋएछ ऋनी सरकारपुढे ३ महत्त्वाच्या मागण्या ठेवल्या होत्या. त्यातील सर्वात महत्त्वाची मागणी म्हणजे शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा. एकीकडे जंतर मंतरवर आंदोलन जोमाने सुरु झाले, तर दुसरीकडे मुंबईत देखील *(पान २ वर)*



## विशेष संपादकीय

# हेल्मेट नव्हे... आधी रस्ते, पूल आणि वाहतूक व्यवस्था सुरक्षित करा!

### अमरावतीतील विकासाच्या नावाखाली उभे राहिलेले मृत्यूचे सापळे

अमरावती शहरातील राजापेठ उड्डाणपुलावर झालेल्या भीषण अपघातात हेल्मेट घातलेल्या दोन तरुणींचा मृत्यू झाला आणि पुन्हा एकदा संपूर्ण शहर हादरले. या दुर्घटनेने एक अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. जर हेल्मेट घालूनही जीव वाचत नसेल, तर केवळ हेल्मेट सक्ती करून सरकार आणि प्रशासन आपली जबाबदारी संपल्याचे समजते का?

हेल्मेटचा विरोध करण्याचा प्रश्नच नाही. हेल्मेट हे रस्ते सुरक्षेचे महत्त्वाचे साधन आहे. प्रत्येक दुचाकीस्वाराने ते घालणे आवश्यकच आहे. परंतु प्रत्येक अपघाताचे कारण हेल्मेट नसणे असे मानणे ही वस्तुस्थितीपासून पळ काढण्याची सोपी पद्धत झाली आहे. नागरिकांवर नियमांची सक्ती करणाऱ्या प्रशासनाने स्वतःच्या जबाबदारीचे काय?

राजापेठ उड्डाणपूल आणि त्यालगतचा अंडरपास आज अमरावतीतील वाहतुकीचे सर्वात मोठे चर्चेचे विषय आहेत. या दोन्ही प्रकल्पांकडे पाहिले की प्रश्न पडतो हे प्रकल्प वाहतुकीचे नियोजन लक्षात घेऊन उभारले गेले की केवळ कागदावरील विकास दाखवण्यासाठी? आज अनेक नागरिक उघडपणे म्हणतात की पूल आणि अंडरपास कसा नसावा, याचे जिवंत उदाहरण म्हणजे राजापेठ उड्डाणपूल आणि अंडरपास. ही टीका हलक्यात घेण्यासारखी नाही.

सर्वात चिंताजनक बाब म्हणजे अनेक पायाभूत सुविधा तज्ज्ञ अभियंत्यांच्या व्यावसायिक मतांपेक्षा राजकीय हस्तक्षेपामुळे उभ्या राहिल्या, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. जर विकासकामांमध्ये तांत्रिक निकषांपेक्षा राजकीय प्रतिष्ठेला प्राधान्य दिले जात असेल, तर त्याची किंमत सामान्य नागरिकांना जीव देऊन चुकवावी लागते. त्यामुळे राजापेठ उड्डाणपूल आणि अंडरपासचे स्वतंत्र, निष्पक्ष आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांकडून रोड सेफ्टी ऑडिट करणे ही काळाची गरज आहे.

आज अमरावतीतील परिस्थिती अशी झाली आहे की अनेक रस्ते आणि चौक हे वाहतुकीचे मार्ग नसून मृत्यूचे सापळे बनले आहेत. शहरात कुठेही जा अवैध पार्किंग, अतिक्रमण, विस्कळीत सिग्नल व्यवस्था, चुकीचे यू-टर्न, खड्डे, अर्धवट कामे, निकृष्ट दर्जाचे रस्ते आणि वाहतुकीचे कोणतेही वैज्ञानिक नियोजन नसल्याचे चित्र दिसते. त्यातच विकासाच्या नावाखाली उभारल्या जाणाऱ्या कमानी, सौंदर्यीकरण आणि शोभेच्या कामांमुळे वाहतुकीची कोंडी आणखी वाढत आहे.

शहराला आज सर्वाधिक गरज आहे ती नवीन कमानींची नाही, तर सुरक्षित रस्त्यांची. फुलांची सजावट नव्हे, तर स्पष्ट दिशादर्शक फलकांची. रंगीत दिव्यांची नव्हे, तर कार्यक्षम वाहतूक सिग्नलची.

(उर्वरित पान २ वर)

# नागपुरात मुसळधार पाऊस, आज शाळांना सुट्टी
## विदर्भात पुढचे तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

नागपूर दि. २८ : मुंबईसह उपनगरात गेल्या ४ दिवसांपासून पावसाची दमदार हजेरी पाहायला मिळत आहे, त्यात आजच मुंबईत पावसाने दडी मारल्यानंतर आता विदर्भात मुसळधार पाऊस सुरू झाल्याचं दिसून आलं. नागपूरमध्ये आज पावसामुळे रस्त्यावर पाणीच पाणी झालं होतं. तर, विदर्भात पुढील तीन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असून अनेक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. उद्या २९ जुलै रोजी भारतीय हवामान विभागाने दिलेला इशारा लक्षात घेऊन जिल्हा दंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नागपूर शहर, ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सुट्टीचे आदेश निर्गमित केले आहेत. तसेच, नागरिकांनीही आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

नागपूरला हवामान विभागाने ३० जुलै रोजी ऑरेंज अलर्ट दिला असून प्रशासनाने गावपातळीवर खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या २४ तासांत विदर्भात सर्वाधिक १३९ मिमी पावसाची नोंद भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे झाली. *(पान २ वर)*

## माहोल....




डार्लिंग आतापर्यंत आपण बाथरूममध्ये आंघोळ केली, आज हॉलमध्ये करायची का?

## जाहीर सूचना

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे अशिल रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स प्रा. लि. कंपनी यांनी सर्वश्री शेषराव बापूराव गोयटे, राजेंद्र महादेवराव कुरळकर व ए.आर. रिएल्टी तर्फे रामदास कोल्हाजी हेकडे यांचे विरुद्ध खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा मालकी हक्काने ताबा मिळविण्याकरिता वि. पाचवे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात वि. दि. दावा क्र. ३११/२०२६ हा दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी प्रतिवादींचे विरुद्ध त्यांनी वाद मिळकतीचे हस्तांतरण करू नये व स्वरूप बदलु नये यासाठी अंतरिम मनाई आदेशाचा अर्ज देखील केलेला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे निंभोरा खुर्द, ता. व जि. अमरावती येथील, महानगरपालिकेचे हद्दीतील भूमापन क्र. ५६/१-ब पैकी ०१ हेक्टर २१ आर (१२१४१ चौ.मीटर) ही वाणिज्य वापरासाठी रुपांतरीत झालेली खुली जागा. याची चतुःसीमा : पूर्वेस - अमरावती बडनेरा रोड, पश्चिमेस- भूमापन क्र. ५६/१-ड, उत्तरेस - भूमापन क्र. ५६/१-अ आणि दक्षिणेस - भूमापन क्र. ५६/१-ब मधील उर्वरित भाग व ५६/१-क.

प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे वरील मालमत्तेसंबंधी कोणीही वर नमूद व्यक्तींसोबत हस्तांतरणाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. केल्यास तो माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कृपया नोंद घ्यावी.

ॲड. किशोर देशपांडे
१२, विनोद स्टेट बँक कॉलनी, कॅम्प,
अमरावती, ४४४६०२
मो. ९८८१५७४९५४

# न्यायव्यवस्था, कृषी, ग्रामविकास आणि पायाभूत सुविधांना चालना
## मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय

मुंबई दि. २८ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. अनुसूचित जातीपासून ते कृषी विभागापर्यंतच्या या निर्णयाचा यात समावेश आहे. तसेच करज्त आणि अहिल्यानगर येथे अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यासही आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. या शिवाय गौण खनिजाचं अवैध खनन रोखण्यासाठी दहापट दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. महाॲग्री-एआय धोरणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता *(उर्वरित पान २ वर)*